**सायबर पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड, प्रेमलोक पार्क,
चिंचवड, पुणे दुरध्वनी क्रंमाक ०२०-२७३५०१२०

**प्रेसनोट** पिंपरी चिंचवड ,दिनांक - १२/१०/२०२४

# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित होऊन ६० लाख रुपये ऑनलाईन फसवणुकीचा पहिला गुन्हा दाखल

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत सायबर गुन्हयांची तसेच सायबर तक्रारींची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने त्यांना आळा घालण्यासाठी तसेच सदर गुन्हयांचा व्यवस्थितरित्या कौशल्यपुर्ण व जलदगतीने तपास व्हावा याकरीता मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड श्री. विनयकुमार चौबे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र शासन राजपत्र, वर्ष १० अंक ५३/ गुरुवार, जुन,१३, २०२४ असाधारण क्रमांक ९९, चे अधिसुचना अन्वये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय स्तरावर सायबर पोलीस ठाणेची मंजुरी प्राप्त झाली होती.

त्याप्रमाणे दि. ११/१०/२०२४ रोजी मा. गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते सायबर पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवडचे उद्घाटन करण्यात आले असुन पोलीस ठाणे कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यानंतर तात्काळ सांगवी, पुणे येथील एका इसमाची शेअर ट्रेडींगमध्ये ऑनलाईन ६० लाख रुपयांचे झालेले फसवणुकीचा साबयर पोलीस ठाणे येथे दि. १२/१०/२०२४ रोजी पहीला गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्याचा तपास सायबर पोलीस ठाणेकडुन सुरु करण्यात आला आहे.

नवीन सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित झाल्याने सायबर तक्रारींचा व्यवस्थितरित्या कौशल्यपुर्ण व जलदगतीने तपास तसेच सायबर गुन्हयांना प्रतिबंध होण्यास मदत होणार आहे.

( संदीप डोईफोडे)
पोलीस उप आयुक्त,
गुन्हे, पिंपरी चिंचवड